**<u>प्रेसनोट</u> दिनांकः-२३/०८/२०१९**

**बंडगार्डन पोलीस स्टेशन, पुणे शहर**

---

**ताडीवाला रोड परिसरात एका इसमावर अज्ञात ३ ते ४ लोकांनी जिवघेणा हल्ला केला होता. बंडगार्डन पोलीस स्टेशन च्या पोलीसांनी मारेक-यांचा शोध घेवून केले जेरबंद**

दिनांक २१/०८/२०१९ रोजी रात्री ११.३० वा.चे सुमारास इसम नामे विक्रम देवानंद कदम हे नदी किनारी असलेल्या भिंतीवर बसलेले असताना, तोंडाला रूमाल बांधलेले ३ ते ४ जण त्यांचे जवळ आले.त्यातील एकाने सदर इसमास भिंतीवरून खाली उतरण्यास सांगितले. सदर इसम खाली उतरताच त्यास, तोंडाला रूमाल बांधलेल्या ३ ते ४ जणांनी शिवीगाळ करून, धारदार हत्याराने मारहाण करण्यास सुरूवात केली. सदर इसम आरडा-ओरडा करू लागला, त्याचे आवाजाने लोक जमा होवू लागताच मारहाण करून, मारेकरी पळून गेले. मारेकऱ्यांनी कोणताही पुरावा मागे ठेवलेला नसताना, मारेकऱ्यांबाबत काहीएक माहिती नसताना, बंडगार्डन पोलीस स्टेशनचे तपास पथकाचे सहा. पोलीस निरीक्षक संदीप जमदाडे यांनी त्यांचे तपासाचे कौशल्य वापरून, पोलीस कर्मचारी निखील जाधव यांना मिळालेल्या बातमीवरून, तपास पथकातील कर्मचाऱ्यांची ३ पथके तयार करून त्यांना वेगवेगळया ठिकाणी रवाना केले. आरोपींचा माग काढून मारेक-यांपैकी ३ मारेकऱ्यांना अनुक्रमे (१) अभिषेक उर्फ बच्चन दिपक मोरे रा.मंगळवार पेठ, पुणे (२) सिध्दार्थ उर्फ येडा दत्तु जाधव रा.लोहगांव पुणे (३) देव उर्फ चॉकलेट दिनेश पवार रा.ताडीवाला रोड, पुणे यांना पकडून दाखल गुन्हयात अटक केली आहे.

सदरची चांगली कामगिरी वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनिल तांबे, पोलीस निरीक्षक, गुन्हे दिगंबर शिंदे यांचे मार्गदर्शनाखाली सहा. पोलीस निरीक्षक संदीप जमदाडे व पोलीस कर्मचारी कैलास डुकरे, निखील जाधव, अय्याज दड्डीकर, सागर जगताप, गौरव उभे, फिरोज शेख, संतोष पागार, किरण तळेकर, श्रीधर सानप यांनी केलेली आहे.

**वरिष्ठ पोलीस निरीक्षक**
**बंडगार्डन पोलीस स्टेशन पुणे शहर**